सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४३०/४६५/४९२

ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक: १०/एडीएम/पदविका/आवश्यक प्रमाणपत्रं/२०२४/२९२ दिनांक: 27 MAY 2024

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,

सर्व जिल्हाधिकारी कार्यालय,

महाराष्ट्र राज्य.

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मधील इ. दहावीनंतरचे प्रथम वर्ष पदविका, बारावीनंतरचे औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी, सरफेस कोटींग अभ्यासक्रम तसेच बारावी / आयटीआय नंतरचे थेट द्वितीय वर्ष पदविका अशा अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यास इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आवश्यक असणारी प्रमाणपत्र प्राधान्याने उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती...**

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणांस विनंतीपुर्वक कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अखत्यारीत असलेल्या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेशी संबंधीत बाबीची अंमलबजावणी करण्याकरीता संचालक, तंत्रशिक्षण यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केलेले आहे.

राज्यातील तांत्रिक पदविका अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया ही तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत पार पाडली जाते. दरवर्षी महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित आणि खाजगी विनाअनुदानित संस्थांमध्ये तांत्रिक पदविका अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये (कॅप) मध्ये सहभागी होण्यासाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येतात.

तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होत आहे. या प्रवेशप्रक्रियेमध्ये अर्जामध्ये केलेला विशिष्ट प्रवर्गाचा लाभ घेण्यासाठी उदा. राखीव प्रवर्ग, अल्प उत्पन्न इ. बाबत विद्यार्थ्यांना विहित सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले वैध प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. यामध्ये प्रामुख्याने जात/ जमात प्रमाणपत्र, नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (EWS) पात्रता प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, नॅशनॅलिटी / डोमिसाईल इ. अशा प्रमाणपत्रांचा समावेश असतो. अशी विविध प्रमाणपत्रं आपल्या अधिनस्त असलेल्या विविध कार्यालयामार्फत निर्गमित करण्यात येतात. विद्यार्थ्यांना या पदविका प्रवेशप्रक्रियेसाठी उपरोक्त प्रमाणपत्रांची तातडीने आवश्यकता असते जेणेकरुन त्यांना त्यांच्या विशिष्ट प्रवर्गाचा लाभ घेणे शक्य होते.

याकरिता पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आवश्यक असणारी प्रमाणपत्रे प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यासाठी आपल्या अधिनस्त कार्यालयाना पत्र निर्गमित करावे व उपरोक्त कागदपत्रे लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याबाबत आदेशित करावे, ही विनंती. जेणेकरुन जास्तीत जास्त विद्यार्थी त्यांच्या पात्रता व प्रवर्गानुसार पदविका अभ्यासक्रमांस प्रवेश घेऊन आरक्षणाचा लाभ घेऊ शकतील.

आपला,

(डॉ. विनोद मोहितकर)

संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय

महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत: १) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/छ.संभाजीनगर/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे यांना पुढील कार्यवाहीसाठी.

२) पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी नियुक्त केलेले नोडल अधिकारी यांनी सदर प्रकरणी संबंधित मा. जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन सदर पत्राच्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना विनंती करावी.